# नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०२६ मधील निशाण क्र.२९ खालील आदेश

[ CNR No.MHKO090001602026 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ व ३ हे स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषदेचे शासनमान्य सरकारी प्राधिकृत अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांना शासकीय कामातून वेळ न मिळालेने व शासकीय कामानिमीत्त बाहेरगावी जावे लागलेने वेळेत वकिलांना भेटून दावेसंबंधीतची कागदपत्रे व माहिती देता आली नाही. त्याकारणे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून कैफियत दाखल करणेस विलंब केलेला नाही. तरी प्रतिवादी क्र.२ व ३ विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, समाधानकारक कारणे अर्जात नमूद केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल करणेत आलेला आहे. सदर प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जासोबत दाखल केलेल्या कैफियतीचे अवलोकन केले असता सदर कैफियतीवर प्रतिवादी क्र.२ ची सही नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.२ तर्फे प्रतिवादी क्र.३

ला अधिकारपत्र दिले, असा कोणताही अभिलेख नाही त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ची विनंती स्विकारता येणार नाही. सबब सदर अर्जामध्ये केवळ प्रतिवादी क्र.३ बाबत आदेश पारीत करणे न्यायोचित ठरेल. सदर प्रकरणात प्रतिवादी यांची बाजू न्यायालयासमक्ष येणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुतचा दाव्यात अद्याप तुर्तातूर्त मनाईचा अर्जावर चौकशी झालेली नाही. त्यामुळे विना–कैफियतचा आदेश रद्द केलेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांचे मर्यादिपुरता रक्कम रु.३००/– (अक्षरी रक्कम रुपये तीनशे मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर, प्रतिवादी क्र.३ यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणेत येत आहे.

SHRADDHA JITENDRA DOLARE
Digitally signed by SHRADDHA JITENDRA DOLARE
Date: 2026.07.16 17:42:33 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : १६.०७.२०२६.

( एस. जे. डोलारे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज